जीवन मार्ग

संस्थापक : आर. बी. मोरे

संपादक
डॉ. अशोक ढवळे
कार्यकारी संपादक
विजय पाटील
संपादक मंडळ
अजित अभ्यंकर
डॉ. विठ्ठल मोरे
डॉ. उदय नारकर
सुभाष थोरात
डॉ. रमेशचंद्र पाटकर
राजीव देशपांडे
शोभा ठेकेदत्त
हिरा जनार्दन
प्राची हातिवलेकर

मुद्रक/प्रकाशक
डॉ. अशोक ढवळे

अक्षरजुळणी
आत्माराम पडवळ

मुखपृष्ठ व मांडणी
केतन शिंदे

व्यवस्थापक
चंद्रकांत शिंदे

प्रसिद्धी स्थळ
'जनशक्ती', पी. बी. मार्ग
वरळी, मुंबई - ४०० ०१३
फोन : ०२२-२४९५१५७६
फॅक्स : ०२२-२४९६१५२५
ई मेल : mahacpim@gmail.com


# मुख्यमंत्रीपदी योगी आदित्यनाथ : चाल हिंदुत्वाची

गोरखनाथ मंदिराचे महंत योगी आदित्यनाथ, जे गोरखपूर येथील खासदारही आहेत, त्यांना उत्तर प्रदेशाच्या मुख्यमंत्रीपदी बसवणे, याचा अर्थ स्पष्ट आहे. भाजप-आरएसएस ही दुक्कल आपली भविष्यातील निवडणूक रणनीती म्हणून हिंदुत्वाचे कार्ड मजबूत करू पाहत आहे.

१९९८ साली पहिल्यांदा गोरखपूर येथून खासदार म्हणून निवडून आल्यापासूनच आदित्यनाथ यांच्यावर गोरखपूर व आजूबाजूच्या पूर्व उत्तर प्रदेशातील इतर जिल्ह्यांत मुस्लीम द्वेष व धर्मांध हिंसाचार पसरवण्यात प्रत्यक्ष हातभार लावल्याचे आरोप ठेवले गेले आहेत. त्यांचेच अपत्य असलेली 'हिंदू युवा वाहिनी' म्हणजे दुसरे तिसरे काही नसून एक स्वयंभू सशस्त्र सेना आहे. आपल्या निवडणूक प्रचारमोहिमा व नंतरच्या सभांत त्यांचे लक्ष्य केवळ एकच होते, ते म्हणजे मुस्लिमांवर हल्ला!

आदित्यनाथ यांच्यावर अनेक फौजदारी केसेस सुरू आहेत, ज्यापैकी बहुतेक केसेस खुनाचे प्रयत्न, दंगली, संहारक शस्त्रे बाळगणे, दोन धार्मिक गटांत तेढ वाढवणे, धार्मिक स्थळे अपवित्र करणे याच प्रकारात मोडतात. आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखालील युवा वाहिनीचे वैशिष्ट्य केवळ एकच आहे, ते म्हणजे कुठल्याही किरकोळ भांडणाचे व कुरबुरीचे रूपांतर धर्मांध दंगलीत करणे!

अशा व्यक्तीच्या गळ्यात मुख्यमंत्रीपदाची माळ घालणे हा नक्कीच अत्यंत विचारपूर्वक घेण्यात आलेला निर्णय आहे. उत्तर प्रदेशात भाजपला ज्या परिस्थितीत भक्कम बहुमत मिळाले त्यावरून हेच स्पष्ट होते. या विजयाचे श्रेय नरेंद्र मोदी व अमित शहा या जोडीला दिले जात आहे. मोदींना त्यांच्या जनमानसावरील प्रभावाकरिता तर शहांना त्यांच्या संघटनात्मक कौशल्याकरिता!

आदित्यनाथ यांना निवडणुकीदरम्यान एकदाही मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार म्हणून पुढे करण्यात आले नव्हते. भाजप व त्याच्या मित्रपक्षांना निवडणुकीत मिळालेले तीन चतुर्थांश बहुमत हे त्यांना कुठलाही नेता अथवा लॉबीचे दडपण झुगारून हवा तो मुख्यमंत्री देण्यास पुरेसे होते.

त्यामुळेच नरेंद्र मोदी आणि अमित शहा या दुकलीने आरएसएसच्या संगनमताने आकार व लोकसंख्या या दोन्हीबाबतीत देशात सर्वात मोठ्या असणाऱ्या राज्याच्या डोक्यावर विवादास्पद चारित्र्य असणाऱ्या आदित्यनाथ यांना मुख्यमंत्री म्हणून आणून बसवले आहे.

मुख्य धारेतील समाजमाध्यमांचा एक वर्ग आदित्यनाथ यांची छबी सुधारण्याच्या प्रयत्नांत आहे. मठांमध्ये किती जागांवर कशी मुस्लिमांची नेमणूक केली गेली आहे, जे कोणी मुस्लीम खासदार आदित्यनाथ यांची भेट घेतात, त्यांना आदित्यनाथ कसे कधीही निराश करीत नाहीत, असल्या बातम्या पद्धतशीरपणे पेरण्यात येत आहेत.

हिंदुत्ववादी रचनेचे उद्दिष्टच हे आहे, की मुस्लीम या देशात राहू शकतात मात्र त्यांनी हिंदूंचे वर्चस्व मान्य केलेच पाहिजे. गेल्या वीस वर्षांपासून गोरखपूर येथे मारहाण करून गुडघे टेकण्यास भाग पाडण्यात येणाऱ्या मुसलमानांना हात जोडून महंतांपुढे शरण आल्यास आपले काम करून घेण्याची संधीही यापुढे कदाचित मिळू शकेल.

आरएसएस व नरेंद्र मोदी यांनी आपली हिंदु राष्ट्राची संकल्पना पुढे रेटण्याच्या दृष्टीने हे अत्यंत उद्दाम पाऊल उचलले आहे. त्यांनी अशा व्यक्तीला मुख्यमंत्री बनवले आहे, ज्याने प्रत्यक्ष राज्यघटनेलाच उघडपणे आव्हान दिले आहे.

नरेंद्र मोदी यांनी विधानसभा निवडणुकीच्या विजयानिमित्त भाजप मुख्यालयात केलेल्या आपल्या भाषणात 'नवीन भारता'चे निर्माण होऊ घातले असल्याचे विधान केले होते. या 'नवीन भारता'चे रूप-रंग व तोंडवळा कसा असेल, हे आदित्यनाथ यांच्यावर सोपवलेल्या नवीन जबाबदारीतून पुरेसे स्पष्ट होते.

★ ★ ★

# मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिटब्युरोची निवेदने

## उत्तर प्रदेश सरकारने हे हल्ले ताबडतोब थांबवावेत!

आदित्यनाथ हे उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्रीपदी बसल्यापासून तेथील अल्पसंख्याक समाजावर जे हल्ले होत आहेत, त्याचा माकपचा पॉलिटब्यूरो तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करीत आहे. अवैध गोमांस विक्री बंद करण्याच्या बहाण्याने उत्तर प्रदेशचे सरकार केवळ बेकायदेशीरच नव्हे तर सर्वच कत्तलखान्यांना लक्ष्य करीत आहे. राज्याच्या विविध भागांत मांसविक्रीच्या दुकानांवर मोठ्या प्रमाणावर हल्ले होत आहेत.

भारताच्या एकूण मांस निर्यातीतील पन्नास टक्के वाटा एकट्या उत्तर प्रदेश राज्याचा आहे, हे विसरता कामा नये. तेव्हा, अशा प्रकारच्या धोरणामुळे २५ लाखांहून अधिक लोकांच्या उपजीविकेवर विपरीत परिणाम होत आहे. मांसविक्री व उत्पादन या संबंधित सर्वच घटकांवर सरकारची वक्रदृष्टी वळली असून प्रसंगी त्यांच्यावर शारीरिक हल्लेदेखील करण्यात येत आहेत.

भाजपप्रणित केंद्र सरकारने या धार्मिक अल्पसंख्याक समाजाच्या घटनात्मक हक्कांचे संरक्षण करण्याची हमी द्यावी तसेच उत्तर प्रदेशातील भाजप सरकारला अशी विध्वंसक धोरणे राबवण्यापासून रोखावे, असे आवाहन माकपचा पॉलिटब्यूरो करीत आहे.

## मोदी सरकारने उच्च पातळीवरील राजकीय भ्रष्टाचाराला दिले कायदेशीर रूप

मोदी सरकारने देशातील भ्रष्टाचार, विशेषत: निवडणूक प्रक्रियेतील भ्रष्टाचार संपवण्याची केलेली घोषणा म्हणजे दुटप्पीपणाचा कळस असून देशातील जनतेची शुद्ध फसवणूक आहे.

२०१७ सालच्या अर्थविधेयकानुसार गेल्या तीन वर्षातील ७.५ टक्के नफ्याची मर्यादा आणि ज्या राजकीय पक्षांना हे पैसे देण्यात आले त्यांची नावे जाहीर करणे, या दोन्ही सुधारणा रद्द केल्या आहेत. कंपनी कायद्यात करण्यात आलेल्या दुरुस्तीनुसार कॉर्पोरेट कंपन्या राजकीय पक्षांना निवडणूक रोख्यांच्या रूपात देत असलेल्या देणग्यांवर आता काहीही मर्यादा राहणार नाही.

कॉर्पोरेट कंपन्यांनी राजकीय पक्षांना दिलेल्या देणग्या या उच्च स्तरावरील भ्रष्टाचाराचे उगमस्थान असल्यामुळे, माकपने अशा देणग्यांना सातत्याने विरोध केला आहे. मोदी सरकारने केवळ राजकीय पक्षांना देण्यात येणाऱ्या देणगी प्रक्रियेची व्याप्ती वाढवली एवढेच नव्हे, तर मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार करण्याची नवनवीन दारेच या कंपन्यांना उघडून दिली आहेत.

माकपचा पॉलिटब्यूरो याचा तीव्र निषेध करीत असून ज्यांना आपली लोकशाही निवडणूक प्रक्रिया अधिक मजबूत करण्याची इच्छा आहे, असे सर्व राजकीय पक्ष, सामाजिक चळवळी व कार्यकर्ते यांना राजकीय भ्रष्टाचाराला खतपाणी घालणाऱ्या या किळसवाण्या धोरणाला एकत्रितपणे विरोध करण्याचे आवाहन करीत आहे.

## अयोध्याप्रश्नी सर्वोच्च न्यायालयाने निर्णय द्यावा

भारताचे मुख्य न्यायाधीश जे.एस. केहर यांनी अयोध्या प्रश्न वाटाघाटीच्या मार्गाने सोडवावा, असा जो सल्ला दिला आहे तो अनावश्यकच नाही तर अत्यंत बेजबाबदार असा आहे.

सर्वोच्च न्यायालयाकडून अलाहाबाद उच्च न्यायालयाने याविषयी दिलेल्या निकालाविरुद्ध आलेल्या याचिकांवर सुनावणी होणे अपेक्षित आहे. ते करण्याचे सोडून मुख्य न्यायाधीश न्यायालयाबाहेर समझोता करण्याचा सल्ला संबंधित पक्षांना देत आहेत.

अयोध्या प्रश्नावर वाटाघाटी व चर्चा याला एक प्रदीर्घ इतिहास आहे. वर्षानुवर्षे केलेले असे सर्व प्रयत्न फोल ठरले आहेत. १९९२ साली ज्यावेळी एकतर्फी पावले उचलून बाबरी मशीद जमीनदोस्त करण्यात आली, तेव्हाच हा चर्चेचा मार्ग पूर्णपणे बंद झाला होता. आता न्यायव्यवस्थेतील उच्चपदस्थ व्यक्तीने वाटाघाटींचा सल्ला देणे, म्हणजे आजपर्यंत ज्या प्रकारे कायदा मोडण्यात आला, प्रत्यक्ष राज्यघटना पायदळी तुडवण्यात आली त्याकडे संपूर्ण डोळेझाक करणे होय.

मुख्य न्यायाधीशांनी सुब्रमण्यम स्वामी यांना संबंधित पक्षांशी बोलणी करून ते चर्चेला तयार आहेत का, याची चाचपणी करण्यास सांगणे अत्यंत आक्षेपार्ह आहे. याची दोन कारणे आहेत. पहिले कारण हे, की सुब्रमण्यम स्वामी हे काही याचिका दाखल केलेल्यांपैकी नाहीत. दुसरे म्हणजे मशीद पाडून त्या जागेवर मंदिर बांधण्यात यावे ही त्यांची भूमिका जगजाहीर आहे.

ज्या जागेवर बाबरी मशीद उभी होती ती जागा कोणाच्या मालकीची आहे, याचा निर्णय न्यायालयाने घ्यायचा आहे. सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्यापुढे आलेल्या या प्रश्नावर निकाल द्यावा व आपले न्यायालयीन कर्तव्य पार पाडावे.

★ ★ ★

## अ.भा. जनवादी महिला संघटना महाराष्ट्र राज्य कमिटी बैठक

### सोलापूर : दि.२२-२३ एप्रिल २०१७

अ.भा. जनवादी महिला संघटनेच्या राज्य सचिवमंडळाची बैठक बुधवार, दि. २२ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता आणि राज्य कमिटीची बैठक त्याच दिवशी दुपारी २ वाजता गोदुताई घरकुल, सोलापूर येथे भरेल. राज्य कमिटीची बैठक गुरुवार, दि. २३ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत संपेल. बैठकीचे परिपत्रक पाठविले आहे, त्यातील सूचना अंमलात आणून सर्व जणींनी या बैठकीसाठी अवश्य वेळेवर उपस्थित राहावे.

**मरियम ढवळे**
राज्य अध्यक्षा

**सोन्या गिल**
राज्य सचिव

# अखिल भारतीय किसान सभेचे सरचिटणीस हन्नन मोल्ला यांचे स्टेट बँक अध्यक्षांना खुले पत्र

प्रति, २३ मार्च २०१७, नवी दिल्ली

**श्रीमती अरुंधती भट्टाचार्य**
अध्यक्ष, स्टेट बँक ऑफ इंडिया,
स्टेट बँक भवन, कामा रोड,
मुंबई - ४०० ०२१.

महोदया,

पत्र लिहिण्याचे प्रयोजन असे, की आपण १५ मार्च २०१७ रोजी मुंबई येथे चेंबर ऑफ इंडियन इंडस्ट्रीजच्या सभेत बोलताना शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली तर बँकेची पत सुरक्षा धोक्यात येईल, असे विधान केले. अखिल भारतीय किसान सभा ही देशभरातील २३ राज्यांत एकूण १.७ कोटीहून अधिक सभासद असलेली शेतकऱ्यांची सर्वात मोठी संघटना कर्जाच्या सापळ्यातून शेतकऱ्यांना मुक्त करण्याच्या दृष्टीने कर्जमाफी द्यावी ही मागणी सातत्याने लावून धरत आहे.

अत्यंत दुर्दैवी बाब अशी, की आपण हे विधान केले ते नेमके पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांचे निकाल लागल्याबरोबर. यामुळे भाजप सत्तेत आल्यास शेतकऱ्यांचे सर्व कर्ज माफ केले जाईल, असे जे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तर प्रदेशच्या जनतेला दिले होते, त्या आश्वासनाची पूर्तता न करण्याचा आयता बहाणा त्यांना आपण असे विधान करून मिळवून दिला आहे.

शेतकरी कर्जाच्या सापळ्यात अडकतात ते त्यांच्या चुकांमुळे नव्हे तर सरकारच्या व वित्तीय संस्थांच्या चुकीच्या शेती धोरणांमुळे. यात रिझर्व्ह बँक व स्टेट बँकांची धोरणेही आली. जे शेतकरी आपले रक्त व घाम गाळून जनतेचे पोषण करतात, त्यांना संरक्षण देणे ही सरकारची जबाबदारी आहे. मात्र बाजारातील सर्व नियम व सुधारणा या शेतकरीविरोधी असून त्या उत्पादन खर्च निघेल इतकाही भाव शेतमालाला न देऊन शेतकऱ्यांचे शोषण करणाऱ्या व त्यांना अहोरात्र मेहनत करूनही देशोधडीला लावणाऱ्या केवळ बडे उद्योगपती व व्यापारी घराणे यांचीच तळी उचलून धरतात. स्वामीनाथन आयोगाने केलेल्या शिफारसीत असे स्पष्टपणे म्हटले आहे, की प्रत्येक पिकाच्या उत्पादन खर्चाहून पन्नास टक्के अधिक रक्कम शेतकऱ्यांना किमान आधारभूत भाव म्हणून देण्यात यावी.

२०१४च्या लोकसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यात भाजपने निवडून आल्यास स्वामीनाथन आयोगाच्या शिफारसी लागू करू, असे आश्वासन दिले होते. आजतागायत पंतप्रधानांनी यावर अवाक्षर काढलेले नाही. शेतकरी बिचारा आपल्या मेहनतीच्या बदल्यात लागवडीकरता झालेला खर्चही वसूल करू शकत नाही. अशा परिस्थितीत त्याच्याकडून कर्जफेडीची अपेक्षा कशी करता येईल ?

अशावेळी २९ सरकारी बँकांनी मिळून कित्येक उद्योग घराण्यांचे २०१३ ते २०१५ सालादरम्यान घेतलेले १.१४ कोटी रुपयांचे कर्ज माफ केले, याची आठवण आल्यावाचून राहत नाही. ही कर्जमाफी करणाऱ्या बँकांत एसबीआयचा पण समावेश आहे. या धनदांडग्यांचे कर्ज माफ करताना तुम्हाला पत सुरक्षेची आठवण का झाली नाही ? त्याशिवाय मोठमोठ्या औद्योगिक घराण्यांनी बँकांचे ११ कोटी रुपयांचे कर्ज अद्याप परत केलेले नाही. त्यांच्यावर बँकांनी आजवर काय कारवाई केली ?

दारिद्र्य आणि कर्जबाजारीपणा यामुळे शेतकरी विशेषत: गरीब व मध्यम शेतकरी आत्महत्यांत प्रचंड वाढ झाली आहे. ग्रामीण भागांतून शहरी भागांकडे हा वर्ग मोठ्या प्रमाणात स्थलांतर करू लागला आहे. गरीब व श्रीमंत यांतील दरी दिवसेंदिवस वाढतेच आहे. इतकी वाईट अवस्था असूनही त्यांना शासन व बँका कर्ज देत नसल्यामुळे खाजगी सावकारांकडे जावे लागते व सावकार लावतील त्या लुटारू दराने कर्ज काढावे लागते.

अशा परिस्थितीत जेव्हा या गरीब व लहान शेतकऱ्याला जिवंत राहण्याकरता आधार देण्याची व कर्जाच्या विळख्यातून सोडवण्याची गरज आहे, अशा वेळी तुमच्यासारख्या देशातील सर्वात मोठ्या वित्तीय संस्थेच्या प्रमुखाने असे चुकीचे विधान करणे अत्यंत आक्षेपार्ह असून ते तुम्ही ताबडतोब मागे घेतले पाहिजे. या विधानाबद्दल तुम्ही किमान दिलगिरी तरी व्यक्त केलीच पाहिजे.

आम्ही आमच्या परीने शेती व्यवसाय व्यवहार्य ठरेल, शेतमालाला किफायतशीर भाव मिळेल, वित्तीय संस्थांनी मदतीचा हात दिल्यामुळे सावकारांच्या पाशातून शेतकरी मुक्त होतील तसेच आत्महत्या करण्यापासून परावृत्त होतील, याकरता सुरू असलेला आमचा लढा नक्कीच तीव्र करू.

★ ★ ★

## डीवायएफआयचे महाराष्ट्र राज्य शिबिर

### मुंबई : दि.२२-२३-२४ एप्रिल २०१७

डीवायएफआयचे महाराष्ट्र राज्य शिबिर आदर्श विद्यालय, शेल कॉलनी, चेंबूर, टिळकनगर रेल्वे स्टेशन (पूर्व) मुंबई येथे शनिवार, २२ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता सुरू होईल व ते सोमवार, २४ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता संपेल. प्रत्येक जिल्ह्याला शिबिरार्थींचे कोटे दिले आहेत. प्रतिनिधी फी रु. १००/- आहे. सर्व शिबिरार्थींनी अवश्य वेळेवर उपस्थित राहावे आणि शिबिराच्या शेवटपर्यंत थांबावे.

**सुनिल धानवा** — राज्य अध्यक्ष
**प्रीती शेखर** — राज्य सचिव

# विद्यार्थी आणि लोक लढे

सीताराम येचुरी

देशात आज एक अहिंसक अराजकाची परिस्थिती आहे. विद्यार्थी, शिक्षक, पालक, सामान्य जनता, महिला, शेतकरी, कामगार, उद्योगपती आणि कालपर्यंत सोने-चांदीचे व्यापारीसुद्धा अत्यंत अस्वस्थ आहेत. समाज आणि सरकार गवताच्या गंजीवर बसल्यासारखे आहेत. या अस्वस्थतेचा स्फोट कधीही होऊ शकतो. अशा वेळी समाजाला योग्य दिशा दाखवणाऱ्या सामाजिक नेतृत्वाची मोठी गरज आहे. त्यासाठी शांततामय मार्गाने लोकलढे उभारणे हाच आजच्या अस्वस्थतेवरचा उपाय आहे.

मी देशातल्या प्रत्येक युवक-युवतीला भारत देशाचा सैनिक मानतो. सीमेवर भारताचे रक्षण करणारे सैनिक यांच्याबाबत आदर आहेच. परंतु सीमेबरोबरच सीमेच्या आत लोकशाहीची मूल्ये जपणारी युवा पिढीदेखील आदरास पात्र आहे. ही युवा पिढी भारताच्या भविष्यासाठीच काम करते आहे.

हे सांगण्याचे कारण म्हणजे गेल्या काही दिवसांपासून आपल्या देशात ज्या घटना घडत आहेत, त्याचा संदर्भ त्यामागे आहे. जेएनयूमध्ये, हैदराबाद, अलाहाबाद, माधोपूर, पुणे येथे विद्यार्थ्यांची आंदोलनं चिरडली गेली. याचा अर्थ एकच आहे की, काही देशविघातक शक्ती भारताच्या सार्वभौम गणराज्याच्या विरोधात काम करत आहेत. त्यांची सुरुवात शैक्षणिक संस्थांपासून सुरू झाली आहे. या गोष्टीकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे.

सरकार आणि विद्यार्थ्यांच्या या संघर्षाला जुना इतिहास आहे. याची सुरुवात १९२० पासूनच झालेली आहे. १९२० साली राष्ट्रीय काँग्रेस ही संघटना कोणत्या विषयावर काम करायचे आहे याबाबत स्पष्ट होती. स्वतंत्र भारत हा 'धर्म निरपेक्ष' असेल याची राष्ट्रीय काँग्रेसने ग्वाही दिलेली होती. ब्रिटिशांच्या विरोधात लढून आपण स्वातंत्र्य जरूर मिळवले; परंतु हे स्वातंत्र्य जेवढे सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचे होते तेवढेच आर्थिकदृष्ट्यादेखील महत्त्वाचे होते.

आर्थिक स्वातंत्र्य हे समाजवादी विचारांनी येणार आहे, हे सगळ्यांनाच मान्य होते आणि आहे. या विचारधारेतून कम्युनिस्ट पार्टी उदयाला आली. त्याच दरम्यान भारतीय समाज व्यवस्था ही तिथल्या लोकांच्या जातीवर आधारित असावी, असा मतप्रवाह निर्माण होत होता. तो मतप्रवाह मांडणाऱ्या दोन संघटना म्हणजे आरएसएस आणि मुस्लीम लीग. आरएसएसची हिंदू राष्ट्राची मागणी होती, आजही आहे.

मुस्लीम लीग इस्लामिक राष्ट्राची मागणी करत होते. नंतर भारताची फाळणी झाली, इस्लामिक राष्ट्राची मागणी करणारे पाकिस्तानात जाऊन स्थायिक झाले. हिंदू राष्ट्राची आरएसएसची मागणी भारतीयांनी धुडकावून लावली. त्याबद्दलचा राग अजूनही आरएसएसच्या मनात कायम आहे. म्हणून वर म्हटल्याप्रमाणे १९२० पासूनचा तो संघर्ष अजूनही वेगवेगळ्या रूपात आरएसएस आणि लोकशाहीवादी लोकांत झडत असतो.

एकीकडे लोकशाही मूल्य जपणारे लोक, आर्थिक समानता यावी यासाठी काम करणारे लोक लढत असतात, तर दुसऱ्या बाजूला धार्मिक/सांप्रदायिक राजकारणासाठी आरएसएससारख्या संघटना संघर्ष चिघळवत असतात. आम्हाला स्वराज हवे आहे, 'स्वराज' म्हणजे स्वत:चे राज्य. हिंदू राष्ट्र म्हणजे केवळ हिंदूंचे राष्ट्र.

केवळ कुठल्या धर्माचे राज्य आम्हाला नको आहे. गोळवलकर याबद्दल स्पष्ट होते. ते हिटलरकडे आदर्श म्हणून पाहत होते. त्याने कशाप्रकारे संघर्ष घडवून स्वत:ची मक्तेदारी सिद्ध केली. त्याने जर्मनीत फॅसिझमची स्थापना घडवून आणली. हिटलरने आमचा नाझीवाद म्हणजे खरा राष्ट्रवाद आहे, असे लोकांना सांगितले. लोकशाही समाजवाद, आर्थिक समानता असे मुद्दे तर या राष्ट्रवादात नव्हते. हिटलर आणि नाझीवादाचा आदर्श घेऊन आरएसएसची बांधणी झालेली आहे.

घटना समितीला संविधान सुपूर्द करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले भाषण आठवा. त्यात ते म्हणतात की, 'आम्ही भारताचे गणराज्य म्हणून सगळ्यांना समान अधिकार देत आहोत. संविधानाद्वारे एक व्यक्ती, एक मत आणि समान मूल्य (पत) अशी रचना व्यवस्था असणार आहे.

झोपडीत राहणाऱ्या भारतीय नागरिकाला आणि महालात राहणाऱ्या भारतीय नागरिकाला समान अधिकार असणार आहेत. त्यांच्या मतालाही समान किंमत असणार आहे. परंतु ही व्यवस्था पूर्णत्वास नेण्यात अपयशी झालो तर मी स्वत: ही घटना फाडून टाकीन.' सध्या तुमचे, माझे, अंबानीचे, टाटाचे मत समान आहे, परंतु आपण सगळे मात्र समान नाहीत.

ही विषमता निर्माण करण्यासाठी कुठली व्यवस्था काम करते, हे आपणास सर्वांना माहीत आहे. म्हणून 'एक व्यक्ती, एक मत' या मुद्यावर भारतातील 'जय भीम' व 'लाल सलाम' या शक्ती एकत्र आल्या पाहिजेत. आंबेडकरी विचारधारा आणि कम्युनिस्ट विचारधारा या दोन्हीही विचारधारा या समान मुद्यावर लढत आहेत. स्वातंत्र्य, बंधुता, समता ही दोन्ही मूल्ये दोन्ही विचारधारांना हवी आहेत, परंतु आरएसएसला मात्र ते नको आहे.

आपल्या इतिहासाचे दैवतीकरण चालू आहे. इतिहासात पौराणिक मिथके घुसवली आहेत. असे करून संघ आपला अजेंडा राबवत आहे.

तत्त्वज्ञानात आणि इतिहासात घुसखोरी करायची असेल तर शैक्षणिक संस्थांना टार्गेट करायला हवे, असा डाव संघ आखत आहे. त्यामुळे सध्या शैक्षणिक संस्था आणि संघ यात संघर्ष सुरू आहे. हा काही अपघात नाही. म्हणून मी इथल्या विद्यार्थ्यांना भारताचे सैनिक मानतो, जे अशा सांप्रदायिक शक्तींना विरोध करण्यासाठी उभे ठाकले आहेत.

आपली विचारधारा थोपविण्यासाठी संघ काहीही करू शकतो. ते विद्यार्थ्यांचे आंदोलन चिरडू शकतात, त्यांना राष्ट्रद्रोही घोषित करू शकतात, ते दाभोलकर, पानसरे आणि कलबुर्गींनादेखील मारू शकतात. अशी घातक विचारधारा असलेला संघ परिवार देशाला तोडण्याचे काम करत आहे. त्यामुळे आता आम्हाला आमचा आवाज बुलंद करावा लागणार आहे आणि या सांप्रदायिक शक्तींना सांगावे लागणार आहे की, आम्ही या लोकशाही

*(पान ९ पहा)*

# ७ नोव्हेंबर - जगाच्या कॅलेंडरमधील एक नवीच तारीख

**अल्बर्ट विल्यम्स**

***अल्बर्ट विल्यम्स यांच्या 'पीपल्स डेमॉक्रसी'मधील एका लेखाचा अनुवाद आम्ही खाली प्रसिद्ध करत आहोत. अल्बर्ट विल्यम्स हे एक अमेरिकन पत्रकार होते. शिवाय ते कामगारांना संघटित करीत. त्यांनी १९१७च्या रशियन क्रांतीवर स्वानुभवावर आधारित एक पुस्तक १९६७ साली लिहिले होते. ते त्या क्रांतीचे प्रत्यक्ष साक्षीदार होतेच, पण स्वत: कृतीने सहभागीदेखील झालेले होते. त्यामुळे त्यांच्या पुस्तकातील हा लेखांश वाचकांना उद्बोधक वाटेल.***

पेट्रोग्राडमध्ये रणधुमाळी उडाली आहे. सरकारी सैनिक आणि जनतेत. अख्ख्या रशियातून लोक लोंढ्यांनी शहरात येत आहेत. स्मोल्नीत सोव्हिएट्सची दुसरी अखिल रशियन परिषद भरत असून तिचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने आणि उत्साहाने शहरात येत आहेत. साऱ्या नजरा स्मोल्नीकडे लागल्या आहेत.

स्मोल्नी ही मुळात अमीर-उमरावांच्या मुलींची शाळा. ती आता सोव्हिएट्सचे केंद्र बनली आहे. नेव्हा नदीच्या किनाऱ्यावर उभारलेली महाकाय इमारत, दिवसा करडी आणि थंडगार दिसणारी. पण रात्री मात्र शेकडो खिडक्यांतून डोकावणाऱ्या दिव्यांच्या प्रकाशानं उजळलेली. जणू काही एक मंदिरच - क्रांतीचं मंदिर. राखणीसाठी प्रवेशद्वारासमोर दोन भल्या मोठ्या शेकोट्या पेटवलेल्या. राखण आणि उबेसाठी. त्या तेवत ठेवणारे लांब कोट घातलेले सैनिक. त्या अग्निकुंडात पेटलेल्या ज्वाला. या अग्निकुंडावर, या मंदिरावर लाखोंच्या आशा केंद्रीत झालेल्या. गरिबांच्या आणि जीवनसंघर्षाच्या लढ्यात कफल्लक झालेल्या लक्षावधींच्या, युगानुयुगाच्या गुलामीतून, भोगातून, जुलूमशाहीतून मुक्तता होण्याच्या आशेनं या क्रांतीकुंडावर, क्रांतीमंदिरावर नजर लावून बसलेले. त्यांच्यासाठी या क्रांतीमंदिरात, तेथे चेतवलेल्या क्रांतीकुंडात जीवनमरणाची आयुधं घडवली जात आहेत.

त्या रात्री मला एक कामगार भेटला. हडकुळा झालेला, अंगावर चिंध्या झालेले कपडे, अंधाऱ्या रस्त्यातून चाचपडत जाणारा. त्यानं सहज मान उंचावली आणि त्याच्या नजरेसमोर उभी राहिली स्मोल्नीची महाकाय भिंत. हिमवर्षावातून सोनेरी दिसणारी. अचानक डोक्यावरील टोपी काढून दोन्ही हात पसरून तो उंच आवाजात ओरडला, 'कम्यून ! जनता ! क्रांती !' तो तसाच धावत जाऊन त्या इमारतीच्या भल्या थोरल्या दरवाज्यातून आत जाणाऱ्या गर्दीत काही कळायच्या आत लुप्तदेखील झाला.

स्मोल्नीला आलेले हे प्रतिनिधी कोण होते ? युद्धातून माघारी आलेले, हद्दपारीतून, तुरुंगातून, सायबेरियातून मुक्त होऊन आलेले. या परिचयाच्या जुन्या कॉम्रेड्सची कुणाला वर्षानुवर्षे बित्तंबातमीदेखील नव्हती आणि एकदम ओळख पटून उमटलेला चित्कार. धावत धावत मिठीत, आलिंगनात घेतलेला विसावा. पण तेवढंच. क्षणार्धात परिषदेकडे धाव. चर्चासत्रे, प्रतिनिधी सभा, न संपणाऱ्या बैठका.

स्मोल्नी आता एक भलं थोरलं सभागृह बनलेलं. जणू काही पोलाद वितळवायची एक भट्टी. सशस्त्र व्हा ! असा नारा देणारे वक्ते, टाळ्या पिटणारे, शिट्ट्या वाजवणारे श्रोते, सभागृहात शांतता प्रस्थापित करण्यासाठी समोरील टेबलावर हातोडा आपटून आपटून जिकीरीला आलेले सभापती. आपल्या हातातील शस्त्रास्त्रं, मशिनगन्स जमिनीवर फेकणारे सैनिक. आकाश भेदणारी सामुदायिक क्रांतीगीतं. भूमिगत अवस्थेतून अवतरलेल्या लेनिन आणि झिनोव्हिएव यांना दिलेल्या उत्स्फूर्त अभिवादनाचा कडकडाट.

साऱ्या घटनांना एक गरगरणारी गती. सारं वातावरण कमालीचं ताणलेलं; आणि मिनिटागणिक जास्त जास्त ताणणारं. आघाडीवरचे कामगार म्हणजे ऊर्जेची कारंजीच. झोपेची क्षिती नाही, थकव्याचा मागमूस नाही. भीतीचा लवलेश नसलेली ती चमत्कार बनून आलेली माणसं. क्रांतीनं पुढं फेकलेल्या युगभेदक प्रश्नांना निधड्या छातीनं सामोरी जाणारी.

७ नोव्हेंबरच्या रात्रीची वेळ. दहा वाजून चाळीस मिनिटं आणि ती ऐतिहासिक बैठक सुरू झालेली. केवळ रशियाच्याच नव्हे तर मानवतेच्या भवितव्याला वळण देणारी बैठक. आपापल्या पक्ष समित्यांच्या बैठकांतून प्रतिनिधी एका मागोमाग मुख्य सभागृहात येऊ लागतात. बोल्शेव्हिकांचे विरोधक असलेले सभापती व्यासपीठावर स्थानापन्न होतात. सभागृहात शांतता प्रस्थापित करण्यासाठी घंटा वाजवून जाहीर करतात, "दुसऱ्या सोव्हिएट परिषदेच्या पहिल्या सत्राचे उद्घाटन झाले आहे, असे मी जाहीर करतो."

पहिला ठराव परिषदेच्या अध्यक्षमंडळाची निवड करायचा. बोल्शेव्हिकांना १४ जागा मिळतात. इतर सर्व पक्षांना मिळून ११. जुनं अध्यक्षमंडळ पायउतार होतं आणि त्यांची जागा घेतात आजवर बहिष्कृत करण्यात आलेले, गुन्हेगार ठरवून हद्दपार करण्यात आलेले बोल्शेव्हिक नेते. उजव्या पक्षांत मुख्यत: भरणा बुद्धिवाद्यांचा. ते सभागृहाच्या विश्वासार्हतेविषयी शंका घेत विषयपत्रिकेवरच हल्ला चढवतात. चर्चा हा तर त्यांचा आवडता प्रांत. त्यांच्या शक्तीचा बालेकिल्ला. वैचारिक विषय म्हणजे त्यांच्या बुद्धिमत्तेला पर्वणीच. बारीक सारीक मुद्द्यांचा कीस काढत, कामकाजाच्या पद्धतीविषयी आक्षेप घेत राहतात. आणि अचानक रात्रीच्या गर्भातून कसल्यातरी धमाक्यांचे आवाज. चकीत झालेले प्रतिनिधी काय झालं, काय झालं म्हणत एकदम उभे राहतात. ते तोफांचे आवाज होते. क्रूझर ऑरोरा या युद्धनौकेनं विंटर पॅलेसवर आग ओकायला सुरुवात केली होती. आधी काहीसे अंधुक, दबके असलेले आवाज मोठे होत जास्त नियमित होत जातात. जुन्या व्यवस्थेच्या मृत्युगीताला धरलेला ठेका आणि नव्या युगाला ठोकलेली सलामी. आणि त्या सलामीला प्रतिसाद देत प्रतिनिधी एकदिलानं आणि एका आवाजात कानठळ्या बसणाऱ्या आवाजात मागणी करतात, 'सर्व सत्ता सोव्हिएट्सच्या हाती.' आता प्रश्न अगदी नेमक्या शब्दांत परिषदेसमोर ठेवण्यात आला आहे: "सोव्हिएट्स हे रशियाचे नवे कायदेशीर सरकार आहे, हे आता तरी मान्य करता की नाही ?"

**(भाषांतर : डॉ. उदय नारकर)**

# 'नोटाबंदी' : सर्वार्थाने अपयशी ठरलेला निर्णय

**हिरा जनार्दन**

सबंध देशात संतापाची लाट उसळली आहे... अण्णा हजारे आंदोलनानंतर निपचित झालेली जनता पुन्हा एकदा पेटून उठली आहे... मोर्चे, निदर्शने, निषेध-सभा... 'हे सर्व आमचे कष्टाचे पैसे आहेत, मग आम्ही कशासाठी भ्यायचे ?' असा सवाल करीत जनता सरकारला जाब विचारते आहे... सरकारच्या धमकीवजा घोषणांची जनतेने 'ऐसी की तैशी' करून सोडली आहे... बँकांचे व्यवहार ठप्प झाले असून कर्मचारी कार्यालयांमध्ये बसल्या-बसल्या पत्ते, कॅरम, सापसिडी, शब्दकोडी अशा बैठ्या खेळांमध्ये रमून गेले आहेत!!

अशा मथळ्यांनी व बातम्यांनी वर्तमानपत्रांचे रकाने भरले नाहीत. नोटाबंदीच्या तुघलकी निर्णयाचा चित्रवाहिन्यांवरील चर्चांनी सणसणीत समाचार घेतलाच नाही. त्या निर्णयाची पुरती चिरफाड करून भारतातील व जगभरातील निश्चलनीकरणाचा इतिहास, त्याची कारणे व परिणाम अधिकाधिक सोप्या शब्दांत जनतेपुढे मांडण्याची गरज होती. परंतु तसे काहीही घडले नाही.

उलट, 'आपल्याजवळ असलेले पैसे 'काळे' नाहीत. तेच जर सरकारने 'चलन-बाद' केले तर आपले काही खरे नाही.', ह्या विवंचनेत भयभीत झालेली, गांगरलेली जनता जवळ असलेल्या हजार व पाचशेच्या चिल्लर नोटांना जीवदान देण्यासाठी बँकांच्या दाराशी तिष्ठू लागली. ह्या नोटा बदलून मिळाल्या तर ठीक नाहीतर करा खात्यात जमा, असा सगळ्या जुलमाचा रामराम! जुन्या नोटा बाद करण्यापूर्वी तेवढ्या किमतीच्या नव्या नोटा छापून बँकांमध्ये त्याची तरतूद करून ठेवण्याची खबरदारी व जबाबदारी पार न पाडता भारताचे अतिशहाणे पंतप्रधान शहाजोगपणे घोषणा करून मोकळे झाले. तुम्ही-आम्ही मात्र धास्तावलो होतो. आपल्यापाशी हजार-पाचशेच्या नोटा होत्या. पण घाम गाळून, कष्ट करून कमावलेल्या, १००-१०-५० अशा कमी मूल्यांच्या नोटांचे मुळात चलनातले अस्तित्वच अभावात्मक. शंभर नोटांमध्ये '८६' नोटा हजार व पाचशेच्या तर उर्वरित १४ नोटा '१००-५०-१०' रुपयांच्या वाट्यास आलेल्या. हे असे व्यस्त प्रमाण असल्यामुळे हजार-पाचशे मूल्य असलेल्या नोटांचाच चलनात सुळसुळाट असणार हे उघड होते.

थोडक्यात १००० व ५०० रु. मूल्याच्या नोटा बाळगणारी व हाताळणारी जनता अमीर-उमराव नव्हती. तो सरकारी धोरणाचा, कार्यपद्धतीचा परिपाक होता. आपले हे स्वकष्टार्जित धन सरकारच्या नव्या निर्णयाच्या कत्तलखान्यात जिवानिशी जाऊ नये ह्यासाठी सामान्य जनताच बँकांच्या दाराशी रात्र-रात्र जागण्यासाठी घराबाहेर पडली. घाम व अश्रू गाळीत प्रचंड तणावाखाली. हा तणावही दुहेरी-तिहेरी स्वरूपाचा. मुदत संपण्याच्या आत पैसे जमा झाले पाहिजेत, पण नव्या नोटाही उपलब्ध होत नाहीत आणि त्यामुळे बाजारातून दैनंदिन गरजेच्या वस्तू खरेदी करता येत नाहीत. विक्रेत्यांना हव्या आहेत १००, ५०, १०च्या नोटा. पण आणायच्या कुठून ? त्यांचे चलनातले प्रमाण मुळातच तुटपुंजे 'आई जेवू घालीना बाप भीक मागू देईना' अशा कात्रीचा तो काळ... ज्यांच्या शरीराला व मनाला हा ताण पेलवला नाही त्यांनी चक्क ह्या जगाचा निरोप घेतला. तरी... ना मोर्चे निघाले, ना दंगली उसळल्या... सरकारी अंगरख्याच्या इस्त्रीला एकही चूण पडली नाही!

ह्या देशातील सामान्य जनतेचे 'सामान्यत्व' हासुद्धा एक अतिशय गंभीर व चिंतेचा विषय होऊन बसला आहे. ज्या देशात आपण राहतो आहोत त्या देशाचे व्यवस्थापन नक्की कसे चालते ? राजकीय, प्रशासकीय निर्णय नेमके कसे घेतले जातात ? आजचे राजकारण आणि उद्योगपतींचे अर्थकारण ह्यांच्यातले साटेलोटे देशाला कोणत्या दिशेने घेऊन चालले आहे ? आणि त्या सगळ्यांचा आपल्या रोजीरोटीशी असलेला संबंध, त्यांचा आपल्या दैनिक जीवनावर होणारा बरा-वाईट परिणाम ह्याबाबत जनता संपूर्ण अंधारात असते. त्यामुळेच की काय, राजकारण्यांच्या भावनिक आवाहनांची तिला झटकन भुरळ पडते! देशाच्या सीमेवर जवान रात्रंदिवस जागता पहारा व बलिदान देत आहेत. भ्रष्टाचार, काळाबाजार व दहशतवादाविरुद्ध पुकारलेल्या लढाईत तुम्हाला हे (डिमॉनिटायझेशनजन्य) कष्ट उचललेच पाहिजेत.' काळाबाजार, भ्रष्टाचार, दहशतवाद, ही तर जनतेची दुखरी नस. मोदींच्या ह्या भुलभुलैयाची तिला भुरळ पडली नसती तरच नवल! त्यामुळेच दोन-तीन महिने चलनात असलेले एकमेव नाणे होते, 'मोदीपुरस्कृत डिमॉनिटायझेशन!'

ह्यापूर्वी जगात इतरत्र व भारतातही हे निश्चलनीकरण झालेले आहे. चलनातील बदल, भ्रष्टाचार, व भाववाढ रोखणे' रोखीने व्यवहार करण्याची पद्धत रद्द करणे ह्या उद्देशापोटी' निश्चलनीकरणाचे निर्णय घेण्यात आले. परंतु निर्णयाची अंमलबजावणी करताना जनतेला कोणत्याही (आकस्मिक) व्यवहारिक संकटाला सामोरे जावे लागू नये ह्याचीही पुरेपूर खबरदारी घेण्यात आलेली होती. बाद करावयाच्या चलनी नोटांच्या मूल्याइतके नवे चलन आधीच छापून तयार होते व जुने बाद केल्याबरोबर नवे व्यवहारात आणले होते. युरोपियन संघाची निर्मिती झाल्यावर 'युरो' हे चलन त्या संघातील सर्व देशांमध्ये चलनात आणायचे होते, त्यावेळी ते आधी उपलब्ध करून देण्यात आले होते व त्यानुसार विविध देशांमधील चलनबदलास पुरेपूर अवधी देण्यात आला. लोक भयभीत होऊन बँकांमध्ये यादी करणार नाहीत ह्याची काळजी घेण्यात आली.

२०१५ साली झिम्बाब्वेमध्ये भडकलेल्या महागाईला आटोक्यात आणण्यासाठी निश्चलनीकरण झाले होते. मात्र चलन बदलासाठी जनतेला तीन महिन्यांचा कालावधी देण्यात आलेला होता.

भारतातही साठच्या दशकात चलनात असलेल्या रु. १०,००० व ५००० मूल्य असलेल्या नोटा साठेबाज व काळाबाजारवाल्यांच्या पथ्यावर पडल्या होत्या. सत्तरच्या दशकात त्या बाद करण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र त्यावेळी जनसामान्यांच्या व्यवहारावर त्याचा परिणाम झाला नाही. कारण ह्या अधिक मूल्यांच्या नोटांचे प्रमाण कमी मूल्य असलेल्या नोटांच्या तुलनेत खूपच कमी होते आणि उद्योग व्यावसायिकांखेरीज इतरांपाशी अशा नोटा असण्याची सुतराम शक्यताही नव्हती. ५ पैशाच्या नाण्यापासून दहा रुपयांच्या नोटेपर्यंत सामान्यांची झेप होती. त्यावेळी हातात '१०० रुपयांची' नोट

असणे हीदेखील मोठी गोष्ट असे. साहजिकच त्यावेळच्या निर्णयाची हलकीशी झुळुकही जनतेच्या गल्लीबोळात फिरकली नव्हती. बँका आणि सामान्य जनता ह्यांच्यात आजच्यासारखे अनिवार्य नाते तयार झालेले नव्हते.

परंतु, आजची परिस्थिती अगदी वेगळी आहे. 'ऋण काढून सण साजरा करण्या'तील हीनभाव कधीच लयाला गेला आहे. बडे-बडे उद्योग कर्जाच्या पायावर आणि सरकारतर्फे दिल्या जाणाऱ्या विविध सोयीसवलतींच्या (अगदी करसवलतीसुद्धा) मेहेरबानीवरच उभे राहतात व झपाट्याने भरभराटीस येतात. शेतकरी-कर्मचाऱ्यांचा वर्ग सोडल्यास अशा बड्या कर्जदारांना आज मोठे सुगीचे दिवस आले आहेत. करबुडवेगिरी, काळाबाजार, भ्रष्टाचार ही त्यांची मिरास आहे. भ्रष्टाचारात आकंठ सहभागी होऊन काळी माया जमविण्यात शासकीय यंत्रणा (सरकारी कर्मचारी) अग्रेसर आहे मात्र...

मोदी घोषित निश्चलनीकरणाने ज्या सामान्य जनतेचे कंबरडे मोडले ती अज्ञानातल्या आनंदात मश्गुल आहे, तिला वाटतंय की खरंच आता देशातला काळाबाजार, भ्रष्टाचार व दहशतवाद अगदी मुळासकट नष्ट होणार आहे आणि सर्वत्र सुख-शांती-समाधानाचे राज्य येणार आहे.

ह्या जनतेला निदान आता तरी काही प्रश्न पडायला हवेत:

१. एवढा महत्त्वाचा निर्णय घेण्यापूर्वी पंतप्रधानांनी संसदेत विषय मांडून त्यावर चर्चा घडवून आणण्याची लोकशाही प्रक्रिया पार पाडली नाही. लोकशाही संकेतांना पायदळी तुडविण्याची मुभा त्यांना कोणी दिली ?

२. इतकी गुप्तता पाळून त्यांनी काय साधले ? किती भ्रष्टाचारी व काळाबाजारवाले गजाआड गेले ?

३. सर्व पातळ्यांवरचा भ्रष्टाचार सुखेनैव सुरूच आहे. दहशतवाद्यांची नाकेबंदी होऊन देशात शांततामय वातावरण निर्माण झाल्याचे सांगण्याची हिंमत खुद्द पंतप्रधानांशी नाही. हेही आपण पाहतो आहोत.

४. मोठमोठे भांडवलदार, उद्योजक, (देशातले व देशाबाहेर पळून गेलेलेही) साठ पिढ्यांनाही पुरून उरेल इतकी माया जमविणारे राजकारणी ह्यांना कोणालाही मोदींच्या निर्णयाने घायाळ केले नाही. त्या निर्णयाविरुद्ध त्यांनी 'ब्र'देखील काढला नाही.

५. नकली नोटा नष्ट करण्याच्या हेतूचे तर लगेचच तीन तेरा वाजले. नव्या नकली नोटा लगेच इथे-तिथे प्रकट झाल्या.

असा सर्वार्थाने अपयशी ठरलेला निर्णय घेणाऱ्या पंतप्रधानांचे पारडे आजही जडच आहे. देशभरातल्या विधानसभा निकालांनी ते स्पष्ट झाले आहे. दहशतवाद्यांच्या मुसक्या आवळण्यासाठी एवढा मोठा निर्णय घेणाऱ्या पंतप्रधानांनी उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्रीपदावर चक्क एका हिंदू दहशतवाद्याची प्रतिष्ठापना केलेली आहे.

शेतकऱ्यांच्या व कामगारांच्या हिताचा एकही निर्णय घ्यायचा नाही. अशी सरकारची जनहितविरोधी चाल आपण राजरोस पाहतो आहोत. महागाईचा भस्मासूर जैसे-थे मोकाट फिरतो आहे. अशा किती-किती गोष्टींचा उल्लेख करावा ? परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. असे असले तरी गेल्या चार महिन्यांतल्या घडामोडींनी एक फार मोठे सत्य समोर आले आहे आणि सत्ताधारी व भ्रष्टाचाऱ्यांच्या ते पुरते पथ्यावर पडणारे आहे. ते सत्य म्हणजे, 'आमची जनता आणि आमची लोकशाही नुसती झोपलेली नाही तर ती आता 'कोमात' गेली आहे हीच ती 'जगातली सर्वात बलाढ्य लोकशाही !'

★ ★ ★

## (विद्यार्थी आणि लोक लढे... पान ६ वरून)

समाजवादी भारतीय गणराज्याचे रक्षक आहोत. जेएनयू व हैदराबादसारखे प्रकरण घडवून तुम्ही इथली लोकशाही व्यवस्था खिळखिळी करू शकत नाही.

लोकसभेत खुर्चीवर बसले की, विदेशयात्रेची सवय झालेले प्रधानमंत्री सीटबेल्ट शोधत असतात, महत्त्वाची चर्चा सुरू असताना डुलक्या घेत असतात. यावरून कोणत्या प्रकारचे 'गव्हर्नन्स' हे सरकार करत आहे हे आपल्या लक्षात येईल. पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यावर मोदींनी संसदेच्या पायरीवर डोके ठेवले.

हे लोकशाहीचे मंदिर आहे वगैरे अशा गोष्टी जनतेला सांगितल्या. त्यानंतर एकदा जेव्हा प्रधानमंत्र्यांना भेटलो तेव्हा विचारले की, ''तुमचे प्रतिनिधी 'रामजादे' व 'हरामजादे' असा बुद्धिभेद निर्माण करत आहेत, तेव्हा त्यांना समज द्या.'' तेव्हापासून तर आतापर्यंत प्रधानमंत्री एकदाही त्यांच्याच प्रतिनिधींच्या असंविधानिक विधानावर बोललेले नाहीत. अशा सर्व गोष्टींना मोदींचा छुपा पाठिंबा आहे, हे मात्र समजण्यासारखे आहे.

कन्हैयाला जामीन देताना आदरणीय न्यायाधीशांनी 'मेरे देश की धरती..' या मनोजकुमारच्या गाण्यातील ओळी बोलून दाखवल्या. हे बोलून दाखवताना त्यांना गुरुदत्तच्या 'प्यासा' चित्रपटातील 'अगर ये दुनिया मिल भी जाये.. जला दो' हे गाणे सुचले नाही. सध्याच्या चालू काळात या गाण्यावरून गुरुदत्तलाही राष्ट्रद्रोही ठरवले गेले असते.

कन्हैयावर राष्ट्रद्रोहाचे आरोप लावून सरकारने काय सिद्ध केले ? कन्हैयाच्या समर्थनार्थ असलेल्या मला, डी. राजा, राहुल गांधी, केजरीवाल आदींवरदेखील राष्ट्रद्रोहाचे आरोप लावले गेले.

ब्रिटिशकाळात भगतसिंग, नेहरू, टिळक यांच्यावरदेखील राष्ट्रद्रोहाचे खटले भरले गेले होते. आज त्यांच्याच परंपरेत आम्ही सगळे आहोत याचा उलट अभिमानच आहे. बनावट व्हीडिओ नॅशनल टीव्हीवर दाखवून कोणी आम्हाला राष्ट्रवाद शिकवणार असेल तर तो आम्हाला मान्य नाही.

देशाविरोधी घोषणा जेएनयूमध्ये दिल्या गेल्या, असे ज्यांचे म्हणणे होते, त्यांचे ते म्हणणे सिद्ध करण्यासाठी गुप्तचर संघटना होती. पण जेव्हा असे सगळे बिनबुडाचे आरोप लावले जात होते, तेव्हा गुप्तचर संघटना काय करत होत्या हा प्रश्न कायम आहे.

सदर प्रश्नावर सगळे डावे पक्ष एकत्र आले. परंतु, एकत्र येणे केवळ पुरेसे नाही. संपूर्ण ताकदीनिशी आपल्याला या देशविघातक शक्तींविरोधात लढावे लागणार आहे, असे केले तरच या देशात लोकशाही टिकून राहील, नाही तर हिंदू राष्ट्राची संकल्पना जोर धरेल.

कन्हैयाच्या समर्थनार्थ जेएनयूमध्ये आम्ही सगळे राजकारण बाजूला ठेवून उभे राहिलो. सामान्य माणूस म्हणून आम्ही तिथे कन्हैयाच्या बाजूने उभे राहिलो. या शक्तींविरोधात राजकीय पक्ष म्हणून न लढता लोकलढा उभारणे गरजेचे आहे. हा लोकलढा उभा करण्याचे काम आपल्या देशातील विद्यार्थीच पूर्ण करू शकतात, असा मला आत्मविश्वास आहे. ★ ★ ★

# सबका साथ - सबका विकास अर्थात भारतीय नाझीवाद

**सुभाष थोरात**

काशीला निधन पावलेला माणूस सरळ स्वर्गात जातो- असे काशीचे धार्मिक महत्त्व सांगितले जाते. त्यातूनच काशीला जाण्याची आणि मरण्याची परंपरा सुरू झालेली दिसते. परंतु गोरखपूरला मरणारा माणूस सरळ नरकातच जातो अशी अंधश्रद्ध समजूत रूढ आहे. ही अंधश्रद्धा दूर करण्यासाठी संत कबीरांनी काशीऐवजी गोरखपूरला मरायचे ठरवले आणि काशीहून ते गोरखपूरला गेले. माणूस मेल्यानंतर त्याचे काय होते ? याचे प्रत्येक धर्मात निरुपण केलेले आहे. अर्थात या साऱ्या कवी कल्पना आहेत. या कवी कल्पनांशी आपल्याला काही देणेघेणे नाही. माणूस मेला की मेलाच. बाकी काही नाही. पण स्वर्ग म्हणजे काहीतरी सर्व सुखाने युक्त ठिकाण आणि नरक म्हणजे केवळ दु:खाची खाण अशी समजूत समाजात रूढ आहे.

उत्तर प्रदेशात सत्तेवर आलेला गोरखपूरचा महंत सत्तेवर येताच जे राजकीय रंग उधळू लागला आहे, त्या परिणामी– उत्तर प्रदेशाचीच नव्हे तर अवघ्या देशाची वाटचाल नरकाकडे सुरू झाली तर आश्चर्य वाटायला नको. मुख्यमंत्रीपदी निवड होताच जे आदेश निघत आहेत त्यावरून आपण हे खात्रीने म्हणू शकतो. उत्तर प्रदेश हे राज्य आपल्या संघराज्याचा जणू भागच नाही अशी परिस्थिती आकाराला येत आहे. निर्णय घेताना काही घटनात्मक बंधने पाळली जाणार आहेत की नाहीत हे प्रश्न पुढे आले आहेत. 'आले योगींच्या मना तेथे कोणाचे चालेना' अशी परिस्थिती आता नऊ दिवसांत उद्भवली आहे. आरएसएसवाल्यांचे हेच ते धर्मावर आधारलेले हिंदू राष्ट्र असावे. तसेच निर्णय घेतले जात आहेत.

शुद्धीकरण तर हा या सनातन वैदिक हिंदुराष्ट्राचा प्राण. जो आपण १९४७च्या महाड चवदार तळ्याच्या ऐतिहासिक सत्याग्रहात अनुभवला. दलितांच्या स्पर्शाने बाटलेले हे तळे पशुंच्या गोमुत्रांनी शुद्ध केले गेले. योगींनींही उत्तर प्रदेशातील मुख्यमंत्र्याच्या निवासाचे असेच शुद्धीकरण केले आहे. म्हणजे १९२७ सालची मानसिकता आज नव्वद वर्षांनंतरही कायम आहे. एकीकडे इस्रोने एकाच वेळी एकशे चार सॅटेलाईट अंतराळात सोडण्याचा तंत्रज्ञानीय पराक्रम साध्य केला आहे आणि दुसरीकडे हे शुद्धीकरण. एकाच वेळी आपण जणू दोन युगात राहत आहोत. मध्ययुग आणि तंत्रयुगाचे हे किती विदारक मिलन आहे. लालुप्रसाद यादव यांनी या बाबतीत व्यक्त केलेली प्रतिक्रिया एकदम योग्य आहे. जी भाजप-आरएसएसच्या ब्राह्मणी मानसिकतेची पोलखोल करते. ते म्हणाले ''दलित आणि मागासवर्गीय मुख्यमंत्री त्या निवासात राहत होते, त्यामुळे ते अशुद्ध बनले होते, त्यामुळे ते आता शुद्ध करून घेतले आहे'' जर ठाकूर आणि ब्राह्मण-मुख्यमंत्री राहत असते तर मात्र ते शुद्ध करण्याची गरज पडली नसती.

पंतप्रधान मोदींनी आपल्या खोटारडेपणाला साजेशी अशी घोषणा उत्तर प्रदेश विधानसभेच्या प्रचारात केली होती. ती म्हणजे सत्तेवर येताच पहिल्या बैठकीमध्ये शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय घेतला जाईल. पण पहिला निर्णय घेतला तो कत्तलखाने बंद करण्याचा आणि ज्यातून आपसुकच हिंदु-मुस्लिम तेढ वाढणार आहे. अर्थात ही तेढ आधीच वाढलेली आहे. मग ते लव्ह जिहाद असो, कैराना असो, मुझफ्फरनगर असो, अखलाखची हत्या असो, ही तेढ नवी गोष्ट नाही. परंतु ज्या मुस्लीम समूहाचा पारंपरिक समजला जाणारा व्यवसाय की ज्यावर लाखो लोकांची रोजीरोटी अवलंबून आहे, तो निकालात काढण्याचे कारस्थान सुरू आहे. केवळ अवैध कत्तलखानेच बंद केले जात आहेत असे जरी सांगितले जात असले तरी नियमानुसार चालणारे अधिकृत कत्तलखानेही बंद केले जात आहेत. त्यामुळेच याच्या निषेधार्थ सर्व मांसविक्रेत्यांनी बेमुदत बंद पुकारला आहे. या व्यवसायात हातावर पोट असणारे अनेक गरीब, त्यांची मुले-बाळे उपाशी मरणार आहेत. त्यात सैनी नावाच्या आमदाराने जो मुझफ्फरनगर दंगलीतील आरोपी आहे, त्याने गोहत्या करणाऱ्यांचे हातपाय तोडण्याची भाषा केली आहे. दलित-मुस्लीम जनतेला ही जणू धमकीच दिली आहे. हा माणूस आमदार आहे– घटनात्मक शपथ घेतलेला आहे. तो कायदेशीर कारवाईची भाषा करत नाही, तर सरळ कायदा हातात घेऊन किंवा स्वत:चाच कायदा निर्माण केला जात आहे. म्हणजे प्रत्यक्षपणे राज्यघटना बासनातच बांधली जात आहे.

पण हे आजच घडत आहे काय ? लोकसभेमध्ये पाच वेळा निवडून आलेल्या योगींनी आतापर्यंत याच स्वरूपाची वक्तव्ये केली आहेत. त्यांच्यावर या संदर्भातल्या केसेस दाखल आहेत. त्याबद्दल खरे तर आतापर्यंत ते तुरुंगात असायला हवे होते. पण त्या त्या वेळी सत्तेवर असणाऱ्या बसपा आणि सपाच्या सरकारांनी कठोर भूमिका न घेता आपल्या मवाळ हिंदुत्वाचेच दर्शन घडवले आहे. मायावतींनी तर एका प्रकरणातून बाहेर पडण्यासाठी त्यांना मदत केल्याचेही बोलले जाते. काँग्रेस आणि बसपा, सपा हे पक्ष सत्तेसाठी हिंदु मतदार नाराज होऊ नयेत म्हणून कायम मवाळ हिंदुत्वाची भूमिका घेत आले आहेत. एकीकडे हिंदू मतदारांना दुखवायचे नाही आणि दुसरीकडे मुस्लीम मतदारांना घाबरवून सोडायचे आणि तुमचे संरक्षक आम्हीच आहोत असे भासवायचे हे दुटप्पी राजकारण आहे.

उत्तर प्रदेशात योगींची मुख्यमंत्रीपदी निवड होताच त्यांचे प्रतिमासंवर्धन सुरू करण्यात आले. त्यांच्या सर्व मुस्लीमद्वेषी भूमिकेला बाजूला सारीत ते कसे मुस्लीमांना मदत करतात वगैरे थापेबाजी सुरू झाली आहे. परंतु 'त्यांनी एक मारला तर आम्ही शंभर मारू', 'त्यांनी एक बलात्कार केला तर आम्ही शंभर करू' तसेच लव्ह जिहाद, कब्रस्थानला दिली जाणारी जमीन, या संदर्भातली त्यांची वक्तव्ये कशी पुसली जाणार. आता योगी म्हणताहेत 'सबका साथ सबका विकास', कोणाचे तुष्टीकरण करणार नाही, याचा सरळ अर्थ असा की मुस्लिमांना या पुढे आम्ही विचारणार नाही त्यांना वगळणार आणि हिंदुंचे तुष्टीकरण मात्र करणार. कैलास मानसरोवराच्या यात्रेसाठी सर्व सुविधांनी युक्त भवन निर्माण करणार आणि या यात्रेसाठी जाणाऱ्यांना ५० हजारांहून एक लाख रुपयांचे अनुदान वाढवून देणार. याचा अर्थ काय होतो. तर दुसऱ्या बाजूला मोदींच्या मंत्रीमंडळातील एकमेव मुस्लीम मंत्री

म्हणतो श्रीमंत मुस्लीमांनी हजसाठी मिळणारे अनुदान सोडून द्यावे. म्हणजे त्याचा फायदा गरिबांना होईल. याचा अर्थ काय होतो, श्रीमंत हिंदुंनीही कैलास मानसरोवर यात्रेसाठी दिले जाणारे अनुदान सोडावे. त्यात गरीब हिंदुंचा फायदा होईल. पण इथे मात्र तो तर्क नाही. सरसकट सर्वच हिंदुना ते मिळणार. सर्वांनाच समान न्यायाची भाषा करायची आणि व्यवहारात मात्र भेदभाव करायचा अशी ही निती आहे.

उत्तर प्रदेशात योगी सत्तेवर येणे आणि राम मंदिराचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर येणे हा खचीत योगायोग नाही. २०१९ची निवडणूक विकासाच्या मुद्यावर लढता येणारच नाही. कारण गरिबांचा कसलाही विकास होणार नाही. उलट ते देशोधडीला लागतील. विकासाचा मुद्दा केवळ भलावण आहे आणि जातीयवादी धर्मवादी चेहरा दडवण्याचे साधन आहे, बाकी काही नाही. पण विकासाच्या नावाखाली जी गोष्ट आज सुरू आहे ती म्हणजे बहुराष्ट्रीय भांडवलाला भारतीय अर्थव्यवस्थेची सर्व दारे सताड उघडली जात आहेत. कॅशलेसचे धोरण याचाच भाग आहे आणि आजच बातमी आली आहे की, ज्या 'वॉलमार्ट'ला भाजप विरोधी पक्षात असताना विरोध करीत होती त्या वॉलमार्टला उत्तर प्रदेशात परवानगी देण्यात आली आहे. पण, विकली गेलेली प्रसार माध्यमे आणि नव्या आर्थिक धोरणांना पाठिंबा असणारे पक्ष या गोष्टी लोकांसमोर आणणार नाहीत. लोकांसमोर येतील त्या धर्मवादी गोष्टी. ज्या समाजाचे ध्रुवीकरण करणाऱ्या असतील.

१८५७च्या स्वातंत्र्य युद्धात याच उत्तर प्रदेशाने हिंदू-मुस्लीम एकतेचे विराट दर्शन ब्रिटिशांना घडवले होते. बंडवाल्यांनी दिल्लीच्या गादीवर बहादुरशहा जफर यांना बसवून भारतीय एकतेचे उदाहरण ठेवले होते. या एकजुटीचा धसका घेऊनच ब्रिटिशांनी 'फोडा आणि झोडा' या नीतीचा अवलंब करून भारतीय इतिहासाला नसलेले हिंदू-मुस्लीम संघर्षाचे धार्मिक परिमाण दिले. मुस्लीम लीग आणि हिंदू महासभेने आणि आरएसएसने याला व्यवहारात धर्मवादी कृती करून आणि सिद्धांतामध्ये आधार पुरवला. द्विराष्ट्राचे धोरण याच धर्मवाद्यांनी पुढे आणले जे आजही आपल्याला छळते आहे.

राज्यघटनेचे नाव घेत घेतच राज्यघटनेचा व्यवहारात गळा घोटण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. भारतीय इतिहासातील गुप्तकाळाला सुवर्णयुग संबोधण्याचा प्रघात आहे. कारण हे युग सनातन वैदिक धर्माच्या सत्तेचे युग होते. काठीला सोने बांधून लोक हिंडत होते असे एक वर्णन केले जाते. परंतु खरे तर ते अंधारयुग होते. जातीव्यवस्था क्रूर आणि अमानुषपणे राबवली जात होती, कर्मकांडांना महत्त्व प्राप्त झाले होते. श्रमप्रतिष्ठेची अवहेलना होऊन कष्टकरी जनतेचे पराकोटीचे शोषण याच काळात सुरू झाले होते.आज उत्तर प्रदेशात याच अंधारयुगाचा प्रादुर्भाव सुरू झाला आहे. आता आपल्यावर इतिहासाने मोठी जबाबदारी सोपिवलेली आहे. कारण एकमेव कम्युनिस्टच असे आहेत की, जे या फॅसिस्टांविरुद्ध ठाम उभे राहतील आणि त्यांचा सर्व पातळ्यांवर मुकाबला करतील. अंतिमत: काँग्रेस आणि इतर भांडवली पक्षांचा काही भरवसा नाही. शेवटी त्यांच्याच कर्तृत्वाने, धोरणांनी देशावर ही वेळ आली आहे. आजची काँग्रेस उद्याची भाजप असू शकेल. पण भाजप कधीही काँग्रेस होणार नाही. कारण तिचा गाभा जात-वर्ग-पुरुषसत्ताक धर्म वर्चस्वाचा आहे, आणि हाच भारतीय नाझीवाद आहे. ★ ★ ★

---

### 'जीवन मार्ग' साप्ताहिक मालकी इ. विषयीचे निवेदन

**फॉर्म IV**

**(नियम १८ पहा)**

| | | |
|---|---|---|
| १. प्रकाशनाचे स्थळ | : | 'जनशक्ती', पी. बी. मार्ग वरळी, मुंबई - ४०००१३ |
| २. प्रकाशनाचा कालावधी | : | साप्ताहिक |
| ३. मुद्रकाचे नाव | : | डॉ. अशोक मित्रचंद्र ढवळे |
| भारतीय नागरिक आहेत का ? | : | होय |
| पत्ता | : | 'जनशक्ती', पी. बी. मार्ग वरळी, मुंबई - ४०००१३ |
| ४. प्रकाशकाचे नाव | : | डॉ. अशोक मित्रचंद्र ढवळे |
| भारतीय नागरिक आहेत का ? | : | होय |
| पत्ता | : | 'जनशक्ती', पी. बी. मार्ग वरळी, मुंबई - ४०००१३ |
| ५. संपादकाचे नाव | : | डॉ. अशोक मित्रचंद्र ढवळे |
| भारतीय नागरिक आहेत का ? | : | होय |
| पत्ता | : | 'जनशक्ती', पी. बी. मार्ग वरळी, मुंबई - ४०००१३ |
| ६. साप्ताहिकाची मालकी | : | भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) महाराष्ट्र राज्य कमिटी 'जनशक्ती', पी. बी. मार्ग वरळी, मुंबई - ४०००१३ |

मी, डॉ. अशोक मित्रचंद्र ढवळे असे जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीनुसार सत्य आहे.

(सही)

मुंबई **डॉ. अशोक मित्रचंद्र ढवळे**

३० मार्च २०१७ **प्रकाशक**

---

# सांगली : बांधकाम कामगार संघटनेचा मेळावा

सांगली जिल्ह्यातील बांधकाम कामगारांचा मेळावा नुकताच सीटूच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला. बांधकाम कामगारांच्या प्रश्नांवर या मेळाव्यात चर्चा करण्यात आली व या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी संघटनेत सामील होण्याचे तसेच त्यासाठी लढा देण्याचे आवाहन करण्यात आले.

बांधकाम व्यवसायातील बहुतांशी कामगार अशिक्षित असल्यामुळे ठेकेदार व मालक त्यांना फसवत असतात. ही फसवणूक करताना मापात व बिलात कपात करून कामगारांना कमी मजुरी दिली जाते. तसेच बांधकाम कामगारांसाठी असलेल्या कोणत्याही शासनाच्या योजनांची माहिती दिली जात नाही. कामगारांच्या इतर प्रश्नांवरही या मेळाव्यात चर्चा झाली.

बांधकाम कामगारांनी सांगली येथील सीटूच्या कार्यालयात उमेश देशमुख व दिलीप कांबळेंशी संपर्क साधण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

या मेळाव्यास लक्ष्मण हादिपनी, आप्पासाहेब बनसोडे, विष्णू काटकर, दीपक साखळकर, राजू व्हयमाने, श्रीकांत कोळी यांसह मोठ्या प्रमाणात कामगार उपस्थित होते. **– दिलीप कांबळे**

**प्रश्न : असे वाटते की, मोदी सरकार सार्वत्रिक मूळप्राप्ती (युनिव्हर्सल बेसिक इन्कम-UBI)ची अंमलबजावणी करण्याच्या दिशेने पुढे जात आहे. आर्थिक सर्व्हेक्षणात 'युबीआय'चे समर्थन केले गेले आहे. याबाबतीत 'माकप'चे काय मत आहे ?**

**– विनय कुमार, दिल्ली**

**उत्तर** : सरकारतर्फे सर्व नागरिकांना (प्रत्येकाला) किमान कमाईची (अर्थप्राप्ती) हमी त्या योजनेद्वारे मिळते तिला सार्वत्रिक मूळप्राप्ती (युनिव्हर्सल बेसिक इन्कम-UBI) असे म्हणतात. प्रत्येक (सर्व) नागरिकांच्या खात्यात दर महिन्याला किमान ठराविक रक्कम जमा होईल, अशी हमी देणारी ही योजना आहे. ही रक्कम ठरविण्याचे मापक काय आहे ? तर एक म्हणजे दारिद्र्यरेषेच्या स्तरावरील लोकांची दरडोई कमाई किती आहे व त्यांना रकमेच्या तुलनेत ती सरासरी किती कमी आहे ते पाहून कमी पडणारी रक्कम किंवा अगदी प्राथमिक पातळीवरले किती सन्मानाचे जीवन जगण्यास अंदाजे किती पैशांची गरज आहे. तेवढी रक्कम (म्हणजे या दोन्हींपैकी एक पर्याय) प्रत्येक नागरिकाच्या खात्यात जमा केली जाते.

देशातली गरिबीची समस्या सोडविण्यासाठी वरील उपाय कितीही आकर्षक वाटत असला तरी ही योजना सर्वार्थाने निर्दोष नाही ते कशी पहा.

## सहचिंतन

१) समाजाच्या विकासात मनुष्याची अर्थप्राप्ती ही त्या विकास प्रक्रियेचे 'साधन' असते, 'साध्य' नव्हे, हे आपण आवर्जून लक्षात घेतले पाहिजे. अधिकाधिक सुखासुखी जीवन जगण्यासाठी अधिकाधिक कमाई (अर्थार्जन) आवश्यक असतेच असे नाही. सुख व अर्थार्जन ह्यांचे समीकरण सामाजिक, आर्थिक व संस्थात्मक अशा अन्य कितीतरी घटकांवर अवलंबून असते. त्यामुळे सरकारने दरडोई एक ठराविक रक्कम लोकांना वाटली की समाजाचा विकास होईल, ही समजूतच मुळात भ्रामक व दिशाभूल करणारी आहे. एकदा का ही योजना कार्यान्वित झाली की, सर्वांना मोफत शालेय शिक्षण व अल्पदरात आरोग्यसेवा पुरविण्याच्या जबाबदारीतून (खरंतर कर्तव्यातून) सरकार मुक्त होते. मग जनतेने आवश्यक ते शिक्षण तसेच औषधोपचार 'बाजारव्यवस्थेत' जी 'किंमत' असेल ती मोजून विकत घ्यायचे असतात. असे करताना सरकारने नागरिकांच्या खात्यात भरलेली रक्कम आणि शिक्षण, आरोग्यसेवा, अन्नधान्यादी जीवनावश्यक बाबींच्या किमतींचा ताळमेळ बसेलच याची काही शाश्वती नाही आणि हमीसुद्धा ! ह्याच अनुषंगाने आणखीही काही प्रश्न उपस्थित होतात.

१) शिक्षण व औषधोपचार विकत घेण्यासाठी सामान्यांना परवडणाऱ्या शाळा व रुग्णालयेच नसतील तर ? २) किंवा शाळा व रुग्णालये आहेत परंतु समाजातील ठराविक उच्चभ्रू गटालाच त्यांचा लाभ घेता येतोय. कारण समाजातील अमुक घटकांसाठी त्यांचे दरवाजे मुळी बंदच आहेत.

३) आज प्रत्यक्षात आपण काय पहातो आहोत ? समाजाच्या अत्यंत निकडीच्या गरजा भागविण्यासाठीच्या सामाजिक सेवा सार्वजनिक वितरणाद्वारे पुरविल्या जात नाहीत. त्याऐवजी सामाजिक सेवा ही विशेष खाजगी खरेदीदारांची मिरास बनली आहे. (आश्चर्याची विशेष बाब अशी की, ह्या मंडळींच्या खाजगी खरेदीचा काही आर्थिक भार चक्क सरकारने उचललेला आहे.)

त्यामुळे 'युबीआय' नावाने येऊ घातलेला हा प्रकल्प खरेतर नवउदारवादाला पडलेले स्वप्न असून ते साकार होऊ पाहत आहे.

जनतेचे हित लाथाडणाऱ्या अशा प्रकारच्या योजनेस माकप पहिल्यापासून ठाम विरोध का करीत आहे, ते आपण लक्षात घ्या. आता आपण या योजनेच्या समर्थकांचे म्हणणे काय आहे ते पाहू या.

ते म्हणतात, 'शिधावाटपासारखी सार्वजनिक वितरण व्यवस्था, महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा), सर्व शिक्षण अभियान, शालेय माध्यान्ह भोजन योजना या सर्व शासकीय योजना भ्रष्टाचाराने पोखरून निघाल्या आहेत. लाभार्थींपर्यंत पोहोचण्याआधीच त्यांना गळती लागलेली असते.' ह्यावर उपाय काय आहे ? तर तोही ते सुचवितात. ते म्हणतात की, 'ह्या सर्व योजना रद्दबातल करून टाका त्याऐवजी लाभार्थींना संबंधित लाभासाठी सरकारने करून ठेवलेली आर्थिक तरतूद रोखीने द्यावी. प्रत्येक लाभार्थ्याच्या वाट्यास येणारी रक्कम त्याच्या नावाच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात यावी.' हीच ती 'युबीआय' योजना होय.

आणि माकपचा त्याला ठाम विरोध आहे. ह्या योजनेच्या पोटात दडलेले धोके गंभीर स्वरूपाचे आहेत. ते आपल्याला दुर्लक्षित करून चालणार नाही.

१. १९६० सालच्या राष्ट्रीय अन्न धोरणातून 'सार्वजनिक वितरण व्यवस्था' योजना (PDS) अस्तित्वात आली. ग्राहक व उत्पादक दोघांचेही हित सांभाळण्यावर ह्या योजनेचा भर होता. शेतकऱ्यांकडून थेट धान्य खरेदी करणे, त्याची साठवणूक करणे व लाभार्थींना परवडणाऱ्या दरात त्याचे शिधावाटप दुकानातून वितरण करणे असे तिचे स्वरूप होते. धान्य खरेदी व रास्त दरातील वितरण करण्याची ही एकात्म पद्धत होती. ही पद्धत मोडणे म्हणजे धान्यसाठ्याचा शेवट करणे. हे धोकादायक आहे. कारण भारतीय शेतीव्यवस्थेचा कणा जर कोणता असेल तर तो म्हणजे सरकार शेतकऱ्यांकडून करीत असलेली धान्यखरेदी.

२. दुसरे असे की, लाभार्थींच्या खात्यात पैसे जमा करण्याचे काम सरकार करते खरे, परंतु इकडे बाजारातील वस्तुंच्या किमती सतत वाढत असतात. त्याचबरोबर लोकांच्या दैनंदिन गरजेच्या बाबींचे (सामाजिक सेवांचे) सरासरी बाजारमूल्य वाढत जाते. श्रीमंतांच्या तुलनेत त्याचा मोठा फटका गरीबांना बसतो. बँक खात्यातील जमा रकमेने लाभार्थींना लाभलेली शक्ती अल्पजीवीच ठरते. थोडक्यात युबीआयचे दृष्य परिणाम पूरक व पोषक दर ठरण्याऐवजी गरिबांना संकटात लोटतील. वाढत्या बाजारभावामुळे त्यांच्या हातात (बँकेत) पडणाऱ्या रकमेची खरी (बाजारातील किंमत) कमी होईल. सरकार तिकडे कर्तव्यपूर्तीच्या समाधानात सुस्त राहिल तर गरीब जनता हवालदिल व त्रस्त होईल.

३. पैशाच्या मूल्यात सातत्याने घटच होत रहाते. त्यामुळे वरील योजनेतून हाती येणारा पैसा नित्य-गरजेच्या वस्तू विकत घेण्यास पुरेसा असेल, ह्याची काही खात्री शाश्वती नाही. थेट पैशाने खरेदी करण्यापेक्षा वस्तुच्या स्वरूपातील सेवा घेणे स्त्रीवर्गास अधिक योग्य वाटते. त्यामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थाच बरी असा ह्यासंदर्भातील अनेकविध चाचण्या व शोधअभ्यासाने हे दाखवून दिले आहे.

४. जगात जेथे जेथे युबीआय वा तत्सम योजना अधिक यशस्वी

झालेल्या दिसतात, तेथील अर्थव्यवस्था विकसित आहेत. अविकसित अर्थव्यवस्थेत त्यांचे दुष्परिणामच जास्त आढळतात. विकसित अर्थव्यवस्था असलेल्या ह्या देशांमध्ये शिक्षण व वैद्यकीय सेवा सरकारतर्फे सर्वांना सरसकट मोफत पुरविल्या जातात. तसेच येथील दरडोई उत्पन्नही अधिक असते. इतके असूनही जे लोक ह्या ना त्या कारणास्तव कल्याणकारी सार्वजनिक सेवांच्या लाभास मुकलेले असतात, त्यांची काळजी घेण्यासाठी तेथील सरकारतर्फे 'युबीआय'सारख्या योजना लागू केल्या जातात. खऱ्या अर्थाने सर्वांचा विकास साधण्यासाठीच्या सर्वंकष उपायांची योजना युबीआय योजना हा असतो.आपल्याकडे तसे नाही. आपले सरकार सामाजिक सेवांतर्गत योजनांच्या कल्याणकारी योजना बंद करण्यासाठी नुसते उतावीळ झालेले असून त्यावर मलमपट्टी करण्यासाठी 'युबीआय'सारख्या योजनांचे घोडे पुढे दामटीत आहे. इतकेच नव्हे तर अधिकाधिक विकासाचे सर्वोत्तम (प्रथम क्रमांकाचे) साधन म्हणून तिचे जोरदार समर्थनही केले जात आहे.

५. आता वळू या आपल्या योजना राबविणाऱ्या सरकारी कार्यपद्धतींकडे, शिधावाटप, शिक्षण, वैद्यकीय आदी सेवांमधील भ्रष्टाचार व अपहार टाळण्यासाठी नवीन योजनेअंतर्गत ज्याच्या त्याच्या बँक खात्यात रक्कम जमा करण्यात आपल्याला पारदर्शकतेचे प्रतिबिंब दिसते खरे पण ज्या नोकरशाहीच्या भरवशावर हे पाऊल उचलण्यात येत आहे, ती नोकरशाही 'दिरंगाई' करण्यात अतिशय सक्षम आहे. त्यामुळे लोकांच्या खात्यात रकमा नियमितपणे भरल्या जातील याची मुळीच शाश्वती नाही. महिनेच काय पण वर्षानुवर्षे देखील रकमा खात्यात जमा होणार नाहीत. मग गरजू जनतेने काय करायचे ? जगण्यासाठी त्यांच्याकडे दोनच पर्याय उरतात. एक तर खरेदी टाळणे किंवा सावकाराकडून कर्ज काढून वाढत्या व्याजाच्या चक्रात भरडून निघणे. पुढेमागे खात्यात 'युबीआय'चे पैसे जमा झाले तरी... वाढत्या व्याजाची पूर्तता करताना जमा रकमेचे मूल्य शून्यवत झालेले असेल. ती पुरे पडणार नाही. तात्पर्य, शासनाकडून विकासासाठी राबवल्या जाणाऱ्या पारदर्शी योजनांचे ढोल बडवले जात असताना गरजू जनता मात्र तेलही 'गेले आणि तूपही गेले' म्हणत आसवं ढाळतानाच फक्त दिसेल,

'सरकारच्या सामाजिक जबाबदारीची गुणात्मक पुनर्रचना करण्यासाठीचे साधन म्हणून 'युबीआय' योजना लागू करणारे सरकार 'थेट पुरवठादारा'ऐवजी 'अप्रत्यक्ष पुरवठादार' म्हणून भूमिका पार पाडील' असे प्रतिपादन 'आर्थिक सर्वेक्षणा'च्या माध्यमातून आले आहे. त्यानुसार खुल्या बाजारात सामाजिक सेवांची खरेदी करणाऱ्या गरिबांना सरकार किरकोळ अर्थसाहाय्य करणार म्हणजे चक्क वाऱ्यावर सोडून मोकळे होणार ! आणि माकपला हे अजिबात मान्य होण्यासारखे नाही. किंबहुना आज अस्तित्वात असलेल्या वस्तू किंवा पैशाच्या रूपातील अनुदानाला पर्याय म्हणून 'युबीआय'ला मान्यता देणे आम्हाला मुळी मंजूरच नाही. सामाजिक संरक्षणार्थ उभारलेल्या पूर्वापार यंत्रणेला अजिबात धक्का न लावता पूरक आधार योजना म्हणून 'युबीआय अंतर्गत' नियोजित रक्कम जनतेच्या खात्यात जमा झाली पाहिजे. त्याबाबत माकप आग्रही आहे.

**(अनुवाद: हिरा जनार्दन)**

# जगणं विसरू नकोस...'सखे'

जगाकडे रोज नव्याने..
बघणं विसरू नकोस....
सखे तू मुक्तपणे तुझं..
जगणं विसरू नकोस....

तुला निराश करणारे
अनेक क्षण येतील...
पाय घालून पाडणारे
अनेक जण येतील...

त्यांना घाबरून तुझं तू
चालणं विसरू नकोस..
नि सखे तू मुक्तपणे तुझं..
जगणं विसरू नकोस....

तुझं कौतुक प्रत्येकाला इथं
रुचेलच असं नाही...
कौतुकासाठी तुझं नाव
सुचेलच असं नाही...

कौतुक मिळवण्यासाठी, काम
करणं विसरू नकोस...
नि सखे तू मुक्तपणे तुझं..
जगणं विसरू नकोस....

तुला सुद्धा मन आहे
याचा विचार कर...
बदलवणा-या मानसिकतेचा
जोरात प्रचार कर...

काळजापासून माया तुझी
झरणं विसरू नकोस...
नि सखे तू मुक्तपणे तुझं..
जगणं विसरू नकोस....



रडावंसं वाटेल तेव्हा
रडून मोकळी हो...
लढावंसं वाटेल तेव्हा,
लढून मोकळी हो....

रडण्यामध्ये तुझं तू
लढणं विसरू नकोस..
नि सखे तू मुक्तपणे तुझं..
जगणं विसरू नकोस....

तुला कुणाला पुरावे
द्यायची गरज नाही...
कुणासाठी तुला परतून
यायची गरज नाही....

ध्येयासाठी पुढेपुढे
चालणं विसरू नकोस..
नि सखे तू मुक्तपणे तुझं..
जगणं विसरू नकोस....

**– प्रा. गणेश गर्दे**

# तेलंगण : समता व सामाजिक न्यायासाठी ४२०० किमीच्या महाजन पदयात्रेची सांगता

**एम. वेणुगोपाल राव**

समता व सामाजिक न्यायाच्या पुनर्स्थापनेकरिता तेलंगण राज्यात माकपने १५४ दिवसांत तब्बल ४२०० किमी लांबीची पदयात्रा काढली. तेलंगण राज्यातील १५००हून अधिक गावे पादाक्रांत करीत हैदराबाद येथे पोहोचलेल्या या पदयात्रेने सरकारच्या नवउदारवादी व धर्मांध अशा दुहेरी हल्ल्यांविरुद्ध डाव्या, लोकशाही व धर्मनिरपेक्ष शक्तींना एकत्र येण्याचे आवाहन केले.

१९ मार्चला पदयात्रेच्या शेवटच्या दिवशी माकपचे सरचिटणीस सीताराम येचुरी, तेलंगण राज्याचे सचिव टी. वीरभद्रम यांच्या नेतृत्वाखाली हैदराबाद शहरात १० किमी लांबीची रॅली काढण्यात आली. पदयात्रेचा शेवट एका प्रचंड जाहीर सभेने झाला. या जाहीर सभेच्या ठिकाणी पोहोचायला रॅलीला तब्बल तीन तास लागले. रस्त्यावर जागोजागी जनतेने अत्यंत उत्स्फूर्ततेने फुले उधळून, फटाके फोडून या पदयात्रेचे जंगी स्वागत केले. रॅलीचा सबंध रस्ता लाल व निळ्या झेंड्यांनी सजलेला होता. 'जय भीम' आणि 'लाल सलाम'च्या घोषणांच्या जयजयकारात एखाद्या प्रचंड उत्सवाचे स्वरूप या रॅलीला लाभले होते.

या रॅलीला मार्गदर्शन करताना सीताराम येचुरी म्हणाले की, 'लाल सलाम' व 'जय भीम' या नाऱ्यांसोबतच शहीद भगतसिंगांनी दिलेला 'इन्कलाब जिंदाबाद'चा नारा पण आपण बुलंद केला पाहिजे. चाळीसच्या दशकात तेलंगणात शेतकऱ्यांनी किसान सभेच्या नेतृत्वाखाली केलेल्या जिगरबाज सशस्त्र लढ्याच्या गौरवपूर्ण वारशाची आठवण करून देत येचुरी यांनी लाल व निळे झेंडे एकत्र आल्यास एक अपराजेय शक्ती उदयाला येईल, असा विश्वास व्यक्त केला.

दलित व अल्पसंख्याकांवर हल्ले करणारे, देशात असहिष्णुता, धर्मांधता वाढवणारे हे सरकार मागासवर्गीय, शोषित-पीडित जनतेला उच्चवर्णीयांचे प्रभुत्व मानण्यास भाग पाडीत आहे, त्यांच्यासाठी राबवल्या जाणाऱ्या विविध समाजकल्याण योजना रद्द करीत सुटले आहे.

चंद्रशेखर राव यांच्या सरकारचाही येचुरी यांनी खरपूस समाचार घेत स्वप्ने दाखवलेला 'सोनेरी तेलंगण' कुठे आहे? असा संतप्त सवाल केला.

केरळचे मुख्यमंत्री पिनरायी विजयन यांनी या जाहीर सभेला संबोधित केले. आपल्या भाषणात केंद्र व राज्य सरकारच्या जनविरोधी, कॉर्पोरेटधार्जिण्या धोरणांचे सामान्यांवर झालेले विपरीत परिणाम, नोटाबंदीमुळे ओढवलेली दुर्दशा, लोकशाहीवर व संघरचनेवर होणारे हल्ले यांचा आढावा त्यांनी घेतला. आंध्र प्रदेशातील सामाजिक, राजकीय व आर्थिक विषमतेला कंटाळून आपण वेगळे तेलंगण राज्य निर्माण केले पण परिस्थितीत तसूभरही फरक पडला नाही. काही ठराविक नेत्यांचीच 'प्रगती' झाली. योगी आदित्यनाथ यांचे मुख्यमंत्री बनणे हे देशभरात पसरत चाललेला 'भगवा आतंक' व त्यामुळे विशेषत: केरळात संघपरिवार करीत असलेला हिंसाचार याबद्दल त्यांनी तीव्र चिंता व्यक्त केली. मात्र याचबरोबर या मग्रूर शक्तीचा पाडाव करणे अशक्य नाही, हेदेखील केरळ, पंजाबचे उदाहरण देऊन त्यांनी पटवून दिले.

टी. वीरभद्रम यांनी आपल्या भाषणात तेलंगणचा सर्वांगीण विकास साध्य होईपर्यंत व सामाजिक न्याय स्थापन होईपर्यंत लाल व निळ्या झेंड्यांचा संघर्ष सुरूच राहील, असे ठणकावून सांगितले. तेलंगणमधील एकूण लोकसंख्येच्या ९३ टक्के हिस्सा हा अनुसूचित जाती, जमाती, मागासवर्गीय व अल्पसंख्याक आहे. त्यांचा विकास वगळून तेलंगणचा विकास होणे अशक्य आहे, असेही ते म्हणाले.

या सभेत भाकपचे तेलंगण राज्याचे सचिव चाडा वेंकट रेड्डी, महाजन पदयात्रेचे संयोजक बी. वेंकट, अविभाजित आंध्र प्रदेश सरकारातील माजी मुख्य सचिव के. माधव राव, माकपचे आमदार सुन्नम राजैय्या, प्रा. कांचा इलैय्या इत्यादींची भाषणे झाली.

सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ चुक्का रामैय्या यांच्या हस्ते या पदयात्रेदरम्यान माकप नेते वीरभद्रम यांनी मुख्यमंत्र्यांनाही अनेक पत्रे पाठविली, ती सर्व पत्रे संकलित करून लोकार्पण करण्यात आली. अनेक राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते, कलाकार तसेच सांस्कृतिक कार्यकर्ते या मेळाव्यात सहभागी झाले होते.

**(अनुवाद : प्राची हातिवलेकर)**

## आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंचाचे दुसरे राज्य अधिवेशन

## अलंगुन, ता.सुरगाणा, जि.नाशिक - दि. २६-२७ एप्रिल २०१७

आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंचाचे दुसरे राज्य अधिवेशन दि. २६-२७ एप्रिल रोजी अलंगुन, ता. सुरगाणा, जि. नाशिक येथे भरेल. या अधिवेशनास मार्गदर्शन करण्यासाठी वृंदा करात आणि खासदार जितेंद्र चौधरी हजर राहतील. प्रतिनिधी फी रु. २००/- असेल.

विविध जिल्ह्यांना दिलेले प्रतिनिधी कोटे पुढीलप्रमाणे आहेत. नाशिक व ठाणे-पालघर - प्रत्येकी ५०, नंदुरबार, अहमदनगर, पुणे, यवतमाळ व नांदेड - प्रत्येकी १०, बुलडाणा, अमरावती, परभणी, हिंगोली, गोंदिया - प्रत्येकी ५.

**आमदार जे. पी. गावीत (अध्यक्ष)  बारक्या मांगात, जयसिंग माळी (संयुक्त निमंत्रक)**